# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः11.06.2024** **वारःमंगळवार**

---

१.नवीन केंद्रीय मंत्रिमंडळाचं खातेवाटप जाहीर-राजनाथ सिंह, अमित शाह, नितीन गडकरी, निर्मला सीतारामन या वरिष्ठ मंत्र्यांची खाती कायम.
२.केंद्राकडून राज्यांना जून महिन्यासाठी संकलित करांपैकी एक लाख ३९ हजार कोटी रुपयांची रक्कम वितरित.
३.ओडिशात नवीन मुख्यमंत्र्याच्या निवडीसाठी भारतीय जनता पक्षाच्या विधिमंडळ पक्षाची आज बैठक.
४.इस्राईल-गाझा युद्धविराम योजनेच्या अमेरिकेनं मांडलेल्या प्रस्तावाला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत मंजुरी.
आणि
५.टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत, दक्षिण आफ्रिकेची बांग्लादेशवर चार धावांनी मात

**<u>मंत्रिमंडळ</u>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या नव्या मंत्रिमंडळाचं खातेवाटप काल जाहीर झालं. यात राजनाथ सिंह यांना संरक्षण, अमित शहा यांना गृह आणि सहकार, निर्मला सीतारामन यांना अर्थ, आणि नितीन गडकरी यांना रस्ते वाहतूक आणि महामार्ग या आधीच्याच मंत्रालयांची जबाबदारी देण्यात आली आहे. पियूष गोयल यांच्याकडं वाणिज्य तसंच एस. जयशंकर यांच्याकडं परराष्ट्र व्यवहार, ही पूर्वीची खाती कायम ठेवण्यात आली आहेत. शिवराजसिंह चौहान यांना कृषी आणि ग्रामीण व्यवहार खातं देण्यात आलं आहे, तर जे. पी. नड्डा आरोग्यमंत्री असतील. अश्विनी वैष्णव यांना यापूर्वीच्या रेल्वे मंत्रालयासह माहिती आणि प्रसारण हे खातं देण्यात आलं आहे. धर्मेंद्र प्रधान- शिक्षण, मनोहरलाल- ऊर्जा, किरण रिजिजू- संसदीय कामकाज, तर अन्नपूर्णा देवी- महिला आणि बालविकास मंत्री असतील.

महाराष्ट्रातले रामदास आठवले यांच्याकडे आधीच्याच सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री पदाचा कार्यभार असेल. प्रतापराव जाधव यांच्याकडं आयुष मंत्रालयाच्या राज्यमंत्रिपदाचा स्वतंत्र प्रभार तसंच आरोग्य कुटुंब कल्याण मंत्रालयाचं राज्यमंत्रीपद सोपवण्यातआलं असून, रक्षा खडसे यांच्याकडं क्रीडा आणि युवक कल्याण राज्यमंत्री पदाचा कार्यभार तर मुरलीधर मोहोळ यांच्याकडं सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री पदाचा कार्यभार सोपवण्यात आला आहे.

दरम्यान, नव्याने स्थापन झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळातील अनेक केंद्रीय मंत्री आज आपला पदभार स्वीकारणार आहेत. यात राजनाथ सिंह, डॉ. एस. जयशंकर, जे. पी. नड्डा, अश्विनी वैष्णव, डॉक्टर मनसुख

मांडविया यांचा समावेश आहे. त्यांच्यासोबत अन्नपूर्णा देवी, गिरीराज सिंह, मनोहर लाल, गजेंद्र सिंह शेखावत, किरेन रिजिजू आणि सीआर पाटील हे देखील आज पदभार स्वीकारणार आहेत. अर्जुन राम मेघवाल आणि डॉ जितेंद्र सिंह हे देखील आज पदभार स्वीकारणार आहेत.

पंतप्रधान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल पदभार स्वीकारल्यानंतर सर्वप्रथम प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा सतरावा हप्ता जारी केला. याअंतर्गत एकंदर २० हजार कोटी रुपये वितरीत करण्यात आले असून, त्याचा फायदा नऊ कोटी 30 लाख शेतकऱ्यांना होणार आहे. आपलं सरकार शेतकरी कल्याणासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे. त्यामुळे नवीन सरकारचा पहिला निर्णय शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी असल्याचं, पंतप्रधानांनी  यावेळी सांगितलं.

**<u>कॅबिनेट</u>**-पंतप्रधान

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तीन कोटी अतिरिक्त घरं बांधण्याचा निर्णय काल केंद्रीय मंत्रिमंडळानं आपल्या पहिल्याच बैठकीत घेतेला. 2015पासून ही योजना राबवली जात असून, या योजनेंतर्गत गेल्या दहा वर्षांत एकंदर 4 कोटी 21 लाख घरं  बांधून पूर्ण झाली आहेत.

**<u>राज्यं कर</u>**

केंद्राकडून राज्यांना जून महिन्यासाठी, संकलित करांपैकी एक लाख ३९ हजार कोटी रुपयांची रक्कम वितरित करण्यात आली आहे. या रकमेमुळं राज्य सरकारांना विकासकामांना गती देण्यासाठी आणि भांडवली खर्चासाठी उपयोग होईल, असं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे. उत्तर प्रदेशला २५ हजार कोटी, बिहारला १४ हजार कोटी, तर मध्य प्रदेशला ११ हजार कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. २०२४-२५साठीच्या अंतरिम अर्थसंकल्पात संकलित करांपैकी राज्यांना २२ लाख २० हजार कोटी रुपये वितरित करण्याचा प्रस्ताव आहे. जून २०२४साठीच्या नियमित रकमेबरोबर आणखी एक हप्ता वितरित केला जाईल, असं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>ओडिशा निवड</u>**

ओडिशात नवीन मुख्यमंत्र्याच्या निवडीसाठी भारतीय जनता पक्षाच्या विधिमंडळ पक्षाची आज दुपारी भुवनेश्वरमध्ये बैठक होणार आहे. नेतानिवडीबाबत केंद्रीय मंत्री राजनाथसिंह आणि भूपेंद्र यादव यांची याबाबत केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्रिपदाबाबत सहमतीनं निर्णय होण्यासाठी ते आमदारांशी चर्चा करतील. ओडिशा विधानसभेत भारतीय जनता पार्टीनं १४७पैकी ७८ जागा जिंकून बहुमत मिळवलं आहे. नवीन सरकारचा उद्या भुवनेश्वरमधल्या जनता मैदानावर शपथविधी होणार आहे.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण विविध भारतीच्या  पुणे केंद्रावरून ऐकत आहात.

**<u>युद्धविराम</u>**

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेनं अमेरिकेनं मांडलेल्या इस्राईल-गाझा युद्धविराम योजनेच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. संपूर्ण युद्धविराम, हमासनं ओलीस ठेवलेल्यांची मुक्तता करणं, निधन झालेल्या ओलिसांचे मृतदेह परत देणं आणि पॅलेस्टिनी कैद्यांना परत पाठवणं अशा गोष्टी या प्रस्तावात नमूद करण्यात आल्या आहेत. सुरक्षा परिषदेच्या  पंधरापैकी १४ देशांनी प्रस्तावाच्या बाजूनं मतदान केलं, तर रशियानं मतदानात भाग घेतला नाही. इस्राईलनं हा प्रस्ताव स्वीकारल्याचा दावा या प्रस्तावात करण्यात आला असून, हमासनं तो मान्य करावा असंही नमूद करण्यात आलं आहे.

**<u>ब्रिक्स स्वागत</u>**

भारतानं ब्रिक्स संघटनेच्या बैठकीत पहिल्यांदाच सहभागी झालेल्या इजिप्त, इराण, सौदी अरेबिया आणि इथिओपियाच्या प्रतिनिधींचं स्वागत केलं आहे. ब्रिक्सचं २०२३मध्ये विस्तारीकरण झालं. त्यानंतर रशियात निझनी नोव्हगोरॉड इथं कालपासून सुरू झालेल्या परराष्ट्रमंत्र्यांच्या बैठकीत पहिल्यांदाच या चारही देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

**<u>विधानपरिषद</u>**

महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी छाननीनंतर एकंदर ८८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसंच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा ४ जागांकरता येत्या २६ जून रोजी मतदान होणार आहे. उद्यापर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. १ जुलैला मतमोजणी होणार आहे.

**<u>धन्यवादयात्रा</u>**

कोंग्रेस पक्षातर्फे उत्तर प्रदेशात “धन्यवाद यात्रा” काढण्यात येणार आहे. उत्तर प्रदेशातील सर्व 403 लोकसभा मतदारसंघात ही यात्रा जाणार आहे. या निवडणुकीत उत्तर प्रदेशात कोंग्रेस पक्षाला सर्वात जास्त मिळाल्या आहेत. मतदारांनी, विशेषतः अमेठी आणि रायबरेली मतदारसंघातील मतदारांनी पक्षावर दाखवलेल्या विश्वासप्रती आभार प्रदर्शित करण्यासाठी या यात्रेचं आयोजन करण्यात आलं आहे. पक्षाचे माजी अध्यक्ष राहुल गांधी आणि पक्षसचिव प्रियंका गांधी-वद्रा यात्रेचं नेतृत्व करणार आहेत.

**<u>आदित्य एल1</u>**

मे महिन्यात सूर्यावर झालेल्या मोठ्या भूचुंबकीय वादळाची आदित्य एल 1 ने टिपलेली छायाचित्रे इस्रोने प्रकाशित केली आहेत. सौर ज्वाळा तसंच अतिनील किरणांचे उत्सर्जन होणाऱ्या विस्तृत तरंगलांबीची व्याप्ती, आणि दीर्घकालीन सौर बदल इत्यादि गोष्टींचा अभ्यास करण्यासाठी खगोलभौतिक शास्त्रज्ञांना या छायाचित्रांचा उपयोग होईल असं इस्रोनं सांगितलं. ही छायाचित्रं इस्रोच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

टी 20 क्रिकेट विश्वकरंडक स्पर्धेमध्ये काल न्यूयॉर्क इथं झालेल्या अत्यंत चुरशीच्या  सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं  बांगलादेशचा चार धावांनी पराभव केला. दक्षिण आफ्रिकेने निर्धारित 20 षटकांत 113 धावा फटकावल्या. यात, हाइनरीश क्लास्सेन याने, 44 चेंडूत काढलेल्या  46 धावांचा मोलाचा वाटा आहे. बांग्लादेश संघाला निर्धारित 20 षटकांत 109 धावा करता आल्या.   आज पाकिस्तान आणि कॅनडा या

संघांदरम्यान सामना होणार आहे. पाकिस्तान संघाला या विश्वकरंडक स्पर्धेत अजूनही विजयाचं खातं उघडता आलेलं नाही. याआधी त्यांना अमेरिका आणि भारताच्या संघाकडून पराभव पत्करावा लागला आहे.

**काळे निधन**

मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अमोल काळे यांचं काल अमेरिकेतील न्यूयॉर्क इथं हृदयविकाराच्या धक्क्यानं निधन झालं. ते 47 वर्षांचे होते. ते अमेरिकेत टी 20 विश्वकरंडक स्पर्धेअंतर्गत भारत आणि पाकिस्तान दरम्यान झालेला सामना पाहण्यासाठी गेले होते. अमोल काळे 2022 मध्ये ते मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष झाले. त्यांच्या कार्यकाळात देशांतर्गत क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी नोंदवण्यात आली. त्यांच्याच कार्यकाळात मुंबई संघाने रणजी करंडक जिंकला.

**उष्णता लाट-पूल-मंदार**

बिहार आणि उत्तर प्रदेशमध्ये पुढचे तीन ते चार दिवस उष्णतेची तीव्र लाट येण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. जम्मू विभाग, पंजाब, राजस्थान, झारखंड, हिमाचल प्रदेशातल्या काही भागांमध्ये उष्णतेची लाट कायम राहील असाही अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, नैऋत्य मोसमी पावसाला उत्तर अरबी समुद्र, गुजरात आणि महाराष्ट्रात पुढे आगेकूच करण्यासाठी अनुकूल स्थिती निर्माण झाल्याचंही हवामान विभागानं म्हटलं आहे. कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि कर्नाटकात पुढचे चार-पाच दिवस विजांसह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार